पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

**मा.शिक्षण समिती**

कार्यपत्रिका क्रमांक – ०६

**सभावृत्तांत**

दिनांक - ०७/११/२०१९ वेळ - दुपारी २.०० वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.शिक्षण समितीची पाक्षिक सभा गुरुवार दिनांक **०७/११/२०१९** रोजी दुपारी **२.००** वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. **मा.पवार मनिषा प्रमोद - सभापती**
२. मा.लोखंडे चंदा राजू
३. मा.सागर बाळासाहेब गवळी
४. मा.गायकवाड निर्मला मनोज
५. मा.वैशाली जालिंदर काळभोर
६. मा.सुलक्षणा राजू धर
७. मा.दर्शले रेखा राजेश

या शिवाय मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.शिंदे – प्रशासन अधिकारी (प्राथमिक शिक्षण विभाग), मा.मुंढे – प्र.शिक्षणाधिकारी(माध्यमिक विभाग) हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

---------

**उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील विषय सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आले.**

विषय क्र.२) दिघी कन्या शाळेतील विद्यार्थी वाहतुकीबाबत. – मा.निर्मला गायकवाड , मा.सागर गवळी यांचा प्रस्ताव.

विषय क्र.३) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सर्व प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांसाठी हस्ताक्षर सुधारणा प्रकल्प राबविण्याबाबत. – मा.निर्मला गायकवाड ,मा.चंदा लोखंडे यांचा प्रस्ताव.

----------

ठराव क्रमांक – १४ विषय क्रमांक – ०१

दिनांक - ०७/११/२०१९ विभाग – शिक्षण विभाग(प्राथमिक)

सुचक : मा.सागर गवळी अनुमोदक : मा.चंदा लोखंडे

संदर्भ – मा.महापालिका अतिरिक्त आयुक्त यांचे पत्र क्र.शि.आस्था/१/कावि/३७८/२०१९ दि.०७/१०/२०१९

विषय – दापोडी कन्या शाळा सकाळ सत्रात भरणेबाब..

विषय क्रमांक १ चा विचार पुढील सभेच्या वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

**सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले.**

ठराव क्रमांक – १५ विषय क्रमांक – ०२

दिनांक - ०७/११/२०१९

सुचक : मा.निर्मला गायकवाड अनुमोदक : मा.सागर गवळी

संदर्भ :- मा.निर्मला गायकवाड, मा.सागर गवळी यांचा प्रस्ताव –

पिंपरी चिंचवड महानगरपालिका दिघी प्रभागात मनपा दिघी कन्या शाळेत इ.१ ली ते ८ वी पर्यंतचे वर्ग शाळेमध्ये फुगेवस्ती, भोसरी,पुणे ३९ या ठिकाणापासून १०४ विद्यार्थी रोज शाळेत येतात. सदर ठिकाण हे शाळेपासून ५ कि.मी. अंतरावर आहे. पुणे-आळंदी रस्ता अतिशय वर्दळीचा आहे. तसेच पुणे-आळंदी रोड व भोसरी- आळंदी रोड हे दोन्ही जास्त वाहतुकीचे असल्यामुळे विद्यार्थ्यांना शाळेमध्ये येण्या –जाण्यासाठी खूप त्रास सहन करावा लागतो. फुगेवस्ती येथील पालकांची विद्यार्थ्यांसाठी बसची मागणी आहे. तरी विद्यार्थ्यांसाठी फुगेवस्ती येथून शाळेपर्यंत येण्यासाठी बसची सुविधा उपलब्ध करुन दिल्यास पट वाढण्यास मदत होईल व विद्यार्थ्यांची सोय होईल. तरी बसची सुविधा उपलब्ध करुन देणेकामी मान्यता देण्यात येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – १६ विषय क्रमांक – ०३

दिनांक - ०७/११/२०१९

सुचक : मा.निर्मला गायकवाड अनुमोदक : मा.चंदा लोखंडे

संदर्भ :- मा.निर्मला गायकवाड, मा.चंदा लोखंडे यांचा प्रस्ताव –

पिंपरी चिंचवड महानगरपालिका सर्व प्राथमिक विद्यालयामध्ये बहुतेक शिक्षण घेणारे विद्यार्थी हे गरीब परिस्थितीतून येत असतात. मनपा शाळेचा दर्जा खाजगी शाळेच्याप्रमाणे करण्यासाठी विद्यार्थ्यांमध्येही शाळेविषयी आवड निर्माण होण्याकरिता तसेच मनपा शाळेतील विद्यार्थ्यांमध्ये शैक्षणिक गुण्वत्ता वाढ करण्याकरिता शिक्षण समिती प्रयत्न करीत आहे. त्याच अनुषंगाने पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सर्व प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांसाठी हस्ताक्षर सुधारणा प्रकल्प राबविण्याबाबत “स्पारकल क्लासेस” अंतर्गत आठ दिवसात व रोज एक तास इंग्रजी अथवा मराठीचे सुंदर हस्ताक्षर राबविण्याचा प्रस्ताव आल आहे. त्यामध्ये प्रती विद्यार्थी प्रती विषय र.रु.१८००/- प्रमाणे होणा-या खर्चास मान्यता देणेकामी मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस करण्यात येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समिती सभेकडे पाठविण्यात यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**(पवार मनिषा प्रमोद)**
**सभापती**
शिक्षण समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी – ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/४६२/२०१९
दिनांक : ०८/११/२०१९



**(उल्हास बबनराव जगताप)**
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.